नि.दि.दा. क्र. ४५/२०२२
उत्तम वि. विलास व इतर
CNR No.MHWS080003332022

## निशाणी क्र. ३२ खालील आदेश

प्रतिवादी क्र. ०१ ने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द लेखी जवाब नाही असा आदेश रद्द होऊन लेखी जवाब दावा दाखल करण्यासाठी केला आहे. त्याच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणात वादीने प्रतिवादींविरुध्द वाद मिळकतीची वाटणी होऊन ताबा मिळणेकरिता दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी हजर झाले असून कागदपत्राअभावी मुदतीत जवाब दाखल करु शकले नाही. त्यामुळे दिनांक १३.०६.२०१३ रोजी त्याच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी क्र. ०१ हा पुराव्याकामी लागणारे महत्वाचे दस्तऐवज मिळत नसल्यामुळे लेखी जवाब दाखल करण्यास वेळ मिळण्याचे अर्ज दिले. परंतु तो आजरोजी लेखी जवाब दाखल करीत असल्याने त्याने लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. असे न झाल्यास त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. याउलट अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ०१ ने सदरचा अर्ज करुन लेखी जवाब अभिलेखावर घेण्याची परवानगी मागितली आहे.

**०२** याउलट वादीच्या वकीलांनी अर्जावर म्हणणे दाखल केले की, प्रतिवादींनी मुदतीत लेखी जवाब दावा दाखल केला नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. याउलट अर्ज मंजूर केल्यास २,०००/– रुपये खर्च लावण्याची विनंती केली.

**०३** दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने दिनांक ०३.०३.२०२२ रोजी सदरचा दावा दाखल केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ ला समन्सची तामिली होऊन तो दिनांक २९.०३.२०२३ रोजी नि.क्र. २६ नुसार हजर होऊन लेखी जवाब दाखल करण्यास वेळ मागितला. परंतु त्याला भरपुर संधी देऊनही त्याने मुदतीत लेखी जवाब दाखल न केल्याने त्याच्याविरुध्द दिनांक १३.०६.२०२३ रोजी विना लेखी जवाब आदेश पारीत झाला. त्यानंतर आजरोजी प्रतिवादी क्र. ०१ च्या वकीलांनी नि.क्र. ३२ खाली सदरचा अर्ज करुन लेखी जवाब दाखल करण्यास परवानगी मिळणेचा अर्ज दाखल केला.

**०४** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी

क्र. ०१ ने लेखी जवाब अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळणेबाबतचा सदर अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे ९० दिवसांचा कालावधी उलटलेला आहे. परंतु असे जरी असले तरी त्याला पुराव्याकामी लागणारे दस्तऐवज मिळत नसल्याने तो मुदतीत लेखी जवाब दावा दाखल करु शकला नाही, असे त्याचे कथन आणि सदर अर्जासोबत त्याने जवाब दावा दाखल केला असल्याने नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रकरणाची सद्यस्थिती बघता प्रतिवादी क्र. ०१ ला योग्य संधी देण्याच्या उद्देशाने व प्रकरण गुणदोषावर निकाली निघावे याकरिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र. ०१ चा अर्ज २००/– रुपये खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादीला अर्जाचा खर्च अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ चा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात यावा.

स्वा/-

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः २१.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 21.07.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 21.07.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 21.07.2023 |